# आसमंत फाउंडेशनतर्फे प्रदूषणमुक्त दिवाळीसाठी प्रबोधन

रत्नागिरी, ता. २२ : प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करण्यासाठी आसमंत बेनोव्हलन्स फाउंडेशनतर्फे शहरामध्ये बोलकी पोस्टर्स लावून प्रबोधन करण्यात आले. पर्यावरण, विद्यार्थी, शास्त्रीय संगीत हे विषय घेऊन काम करणाऱ्या आसमंतने प्रथमच असे फलक सर्वत्र लावले होते. मुख्यमंत्र्यांनीही फटाकेमुक्त व प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले होते. त्याला अनुसरून आसमंत फाउंडेशनने चार उत्तम फलक बनवून घेतले होते. ध्वनी प्रदूषण व हवा प्रदूषण रोखा, या दिवाळीला करूया असे हे फलक शहरातील महत्त्वाच्या नाक्यांवर आणि हॉटेल्सच्या दारात लावण्यात आली होती.




रत्नागिरी : हॉटेल कार्निव्हल येथे 'आसमंत'ने लावलेला फलक.

पर्यावरण संवर्धनासाठी काम करताना आसमंतने एमआयडीसीमध्ये आठ एकरावर ट्री पार्कची उभारणी सुरू केली आहे. हवा, ध्वनी प्रदूषण करणारे फटाके वाजवू नका, असे आवाहन करून आसमंतने आपली जबाबदारी पार पाडली आहे, असे आसमंतचे अध्यक्ष नंदकुमार पटवर्धन यांनी सांगितले.

# आगळ्या फलकांद्वारे 'आसमंत' प्रदूषणमुक्त दिवाळीचा संदेश

प्रतिनिधी
रत्नागिरी

आसमंत फाऊंडेशनतर्फे शहरात बोलक्या पोस्टर्सद्वारे प्रदूषणमूक्त दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले आहे. पर्यावरण, विद्यार्थी आणि शास्त्रीय संगीताच्या विकसनासाठी आसमंत फाऊंडेशन कार्यरत आहे. यातील पर्यावरणाला अनुसरून आगळ्या संकल्पनांचे पोस्टर्स तयार करून प्रदुषणमुक्त दिवाळी साजरी करण्याचे आवाहन अध्यक्ष नंदकुमार पटवर्धन यांनी केले आहे.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रदुषणमुक्त दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले. आसमंत फाऊंडेशननेही हा संदेश आगळ्या फलकांद्वारे रत्नागिरीकरांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे. हे आगळे फलक शहरातील मुख्य नाक्यांवर, तसेच हॉटेल्सच्या दारांत प्रदुषणमुक्त दिवाळीचा संदेश देत आहेत.